# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 14 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- दहशतवादाविरोधातल्या लढाईत भारत–अमेरिका एकत्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिला सत्राची सांगता, नवीन आयकर विधेयक लोकसभेत सादर
- एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत १८ हजारांहून अधिक पदभरती होणार, मंत्री आदिती तटकरे यांची माहिती
- बीडहून जालना, धाराशिव तसंच छत्रपती संभाजीनगरपर्यंतच्या रेल्वेमार्गासाठी सर्वेक्षण करण्याचे रेल्वेमंत्र्यांचे आदेश

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा आज समारोप, १९८ पदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

****

दहशतवादाविरोधातल्या लढाईत भारत–अमेरिका एकत्र असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधान अमेरिकेच्या दौऱ्यावर असून, आज त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. दहशतवाद संपवण्यासाठी ठोस पावलं उचलण्याची आवश्यकता असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

> ***आतंकवाद के खिलाफ लडाई मे भारत और अमेरिका दृढ़ता से साथ खडे रहे, हम सहमत हैं की सीमा पार आतंकवाद के उन्मूलन के लिये ठोस कारवाई आवशयक है.***

ट्रम्प यांच्या कार्यकाळात भारत–अमेरिका मैत्री आणखी वृद्धिंगत होईल, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला, तर अमेरिका भारताला नैसर्गिक वायू आणि तेलपुरवठा करेल, असं ट्रम्प यांनी यावेळी सांगितलं.

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिला सत्राची काल सांगता झाली, त्यामुळे संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज येत्या १० मार्च पर्यंत स्थगित करण्यात आलं आहे. ३१ जानेवारीपासून सुरू झालेल्या अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात ११२ टक्के उत्पादकता नोंदवली गेल्याचं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल काल संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर करण्यात आला.

****

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवीन आयकर विधेयक लोकसभेत मांडलं. विद्यमान आयकर कायदा सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी हे नवीन विधेयक सरकारनं सादर केलं आहे. जुन्या विधेयकातल्या ८१९ कलमांच्या ऐवजी प्रस्तावित विधेयकात ५३६ कलमं असून, कायद्याची भाषा अधिक सुलभ केल्याची माहिती सीतारामन यांनी दिली. या विधेयकावर विचारासाठी एक समिती गठीत करण्यात येणार असून, याबाबतचे सर्वाधिकार सदनाने अध्यक्ष ओम बिर्ला यांना दिले आहेत.

****

जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबवण्यात येत असलेलं जलयुक्त शिवार हे महत्त्वकांक्षी अभियान असून, लोकसहभागातून झालेली कामं हे जलक्रांतीच्या दिशेनं पडलेलं पाऊल असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. जलसंधारण विभागाअंतर्गत ६०१ नवनियुक्त अधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रांचं काल ऑनलाईन पद्धतीनं वितरण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

****

महिला आणि बालविकास विभाग एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत पाच हजार ६३९ अंगणवाडी सेविका आणि १३ हजार २४३ मदतनीस, अशी एकूण १८ हजार ८८२ पदे भरणार असल्याची माहिती, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. मंत्रालयात महिला सहकारी संस्था, महिला बचत गट,

महिला मंडळ आणि अंगणवाडीबाबतच्या विविध प्रश्नांबाबत तसचं भिवंडी शहरात अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढवण्याबाबत काल बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी तटकरे बोलत होत्या.

****

गर्भलिंग निदान चाचणी प्रतिबंधात्मक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, आरोग्य सेविका आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. राज्यातल्या आरोग्य अधिकाऱ्यांची काल दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते. गर्भलिंग निदान केंद्रांवर जरब बसण्याकरता या कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

वाळू माफियांवर मकोका लावणं, हद्दपार करण्यासारख्या कारवाई करण्यात येणार असल्याचं, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं आहे. ते काल अकोल्यात माध्यमांशी बोलत होते. रेती मिळत नसल्याने वाळू माफिया तयार होतात त्यामुळे आता मुबलक प्रमाणात रेती मिळेल आणि लवकरच नवं चांगलं वाळू धोरण जाहीर करू, यामध्ये कडक कायदे असतील असं बावनकुळे यांनी सांगितलं.

****

धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा, मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी महामंडळ हे लाखो रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी एक आदर्श संस्था म्हणून कार्य करेल, असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला आहे. काल महामंडळाच्या पहिल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यभरातल्या सर्व रिक्षा तसंच टॅक्सी चालकांना नाममात्र वार्षिक वर्गणी भरून या मंडळाचं सदस्यत्व घेता येणार आहे. ६५ वर्षावरील ऑटो रिक्षा तसंच टॅक्सी चालकांना महामंडळाकडून प्रत्येकी १० हजार रुपये सन्मान निधीही दिला जाणार आहे.

****

माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव के सी वेणुगोपाल यांनी काल प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांची काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

येडशी–बीड–जालना आणि धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर हा रेल्वेमार्ग मंजूर करण्याची मागणी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी नवी दिल्लीत वैष्णव यांची भेट घेतली. हा मार्ग जोडला तर मराठवाड्यात बीड हे मध्यभागी येवून बीडचा विकास झपाट्याने होईल, याठिकाणी उद्योग व्यवसायाला चालना मिळेल आणि इथल्या नागरिकांच्या हाताला काम मिळेल, असं सोनवणे यांनी सांगितलं. यानंतर वैष्णव यांनी या रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले.

****

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक सहा मधल्या कामांचं सर्वेक्षण, संकल्पन आणि अंदाजपत्रक तयार करण्याची सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबंधित अधिकार्यांना केली आहे. आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी यासंदर्भात मागणी केली होती. या प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक एक ते पाच, घाटणे बॅरेज ते रामदरा तलाव ही कामं सध्या प्रगतीपथावर आहेत, आता टप्पा क्रमांक सहा च्या कामामुळे रामदरा ते बोरी–एकुरगा मध्ये पाणी वितरणाच्या कामाला वेग  येणार असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

****

उत्तराखंड मध्ये सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र सर्वाधिक १९८ पदकं जिंकले आहेत. सर्वाधिक ६८ सुवर्ण पदक जिंकून सेना दल पहिल्या, ५४ सुवर्णांसह महाराष्ट्र दुसऱ्या, तर ४८ सुवर्ण पदकांहस हरियाणा तिसर्या क्रमांकावर आहे.

****

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा रं बोराडे यांना काल मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीनं श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथं मसापच्या नांदापूरकर सभागृहात झालेल्या या शोकसभेत साहित्य तसंच शिक्षण क्षेत्रातल्या विविध मान्यवरांनी बोराडे यांच्या आठवणींना उजाळा दिला.

****

जालना शहरासाठी घाणेवाडी जलाशयाच्या परिसरात १५ मेगावॅट क्षमतेच्या सौर उर्जा प्रकल्पासाठी शंभर कोटींचा निधी मंजूर करून घेतल्याची माहिती, आमदार

अर्जुन खोतकर यांनी दिली. ते काल जालना इथं वार्ताहरांशी बोलत होते. मंजूर निधीतून पहिल्या टप्प्यात ५० कोटी रूपये येत्या तीन चार दिवसात तर उर्वरित निधी मार्चनंतर प्राप्त होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरताना खरी माहिती दडवल्याप्रकरणी परळीच्या फौजदारी न्यायालयाने मंत्री धनंजय मुंडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. करुणा मुंडे यांनी दाखल केलेल्या ऑनलाइन तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त आदेश देण्यात आला आहे. यावर येत्या २४ फेब्रुवारीला परळीच्या फौजदारी न्यायालयात सुनावणी होणार असल्याचं तक्रारदाराचे वकील चंद्रकांत ठोंबरे यांनी सांगितलं.

****

राज्य शासनाने विधवा हा शब्द हटवून त्या ऐवजी 'पूर्णांगिनी' हा शब्द वापरावा, अशी शिफारस, राज्य महिला आयोगाने केली आहे. आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं ही माहिती दिली. 'महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयातील झालेल्या 'महिला अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत त्या बोलत होत्या. आपल्या पदावर काम करतांना सोबतच्या महिलांना जागरुक करण्याचं आवाहन करत, समाजाची मानसिकता बदलण्याची आवश्यकता चाकणकर यांनी व्यक्त केली.

****

जागतिक रेडिओ दिवस काल साजरा झाला. छत्रपती संभाजीनगर इथले संगीत रसिक संजय पवार यांनी जगभरातल्या रेडिओंसोबतच अनेक ग्रामोफोन आणि संगीताच्या दोन हजाराहून अधिक तबकड्यांचा संग्रह केला आहे. आपल्या या संग्रहाचं पवार यांनी काल सर्वसामान्यांसाठी प्रदर्शन भरवलं होतं. शहरातल्या अनेक रेडिओप्रेमींनी या प्रदर्शनाला भेट दिली.

****

आकाशवाणी बीड केंद्रात रेडिओ किसान दिन साजरा करण्यात आला. शेतकरी बांधवांनी आकाशवाणीच्या किसानवाणी कार्यक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर कराव असं आवाहन आत्मा या विभागाचे प्रकल्प संचालक दादासाहेब जाधवर यांनी केले. कार्यक्रमाला

कृषी विज्ञान केंद्र खामगाव आणि डिघोळअंबा येथील अधिकारी तसेच प्रगतशील शेतकरी, पाणी फाऊंडेशनचै कार्यकर्ते उपस्थित होते

****

जालना महापालिकेने `उजास` प्रकल्पांतर्गत गेल्या वर्षापासून उच्च दर्जाच्या पर्यावरणस्नेही कापडी सॅनिटरी पॅडचं उत्पादन सुरू केलं आहे. या प्रकल्पातून आतापर्यंत सुमारे ५० हजार पॅड्सचं उत्पादन झालं, त्यातून महापालिकेला ४३ लाख सहा हजार रुपये उत्पन्न मिळाल्याची माहिती, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिली.

****